# ॥ निवडक मनाचे श्लोक ॥

गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा। मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा
नमू शारदा मूळ चत्वार वाचा। गमू पंथ आनंत या राघवाचा ॥१॥

मना सज्जना भक्तिपंथेचि जावे । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे
जनी निंद्य ते सर्व सोडूनि द्यावे। जनी वंद्य ते सर्व भावे करावे ॥२॥

प्रभाते मनी राम चिंतीत जावा। पुढे वैखरी राम आधी वदावा
सदाचार हा थोर सोडू नये तो। जनी तोचि तो मानवी धन्य होतो ॥३॥

मना वासना दुष्ट कामा न ये रे। मना सर्वथा पापबुद्धि नको रे
मना धर्मता निती सोडू नको हो। मना अंतरी सार विचार राहो ॥४॥

मना पापसंकल्प सोडूनि द्यावा। मना सत्यसंकल्प जीवी धरावा
मना कल्पना ते नको विषयांचि। विकारें घडे हो जनीं सर्व ची ची ॥५॥

नको रे मना क्रोध हा खेदकारी। नको रे मना काम नाना विकारी
नको रे मना लोभ हा अंगिकारु। नको रे मना मत्सरू दंभभारू ॥६॥

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे। मना बोलणे नीच सोशीत जावे
स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे। मना सर्व लोकासि रे नीववावे ॥७॥

देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी। मना सज्जना हेचि क्रिया धरावी
मना चंदनाचे परी त्वा झिजावे। परी अंतरी सज्जना नीववावे ॥८॥

नको रे मना द्रव्य ते पूढिलांचे। अति स्वार्थबुद्धि नुरे पाप साचे
घडे भोगणे पाप ते कर्म खोटे। न होता मनासारिखे दुःख मोठे ॥९॥

जनीं सर्व सूखी असा कोण आहे। विचारे मना तूचि शोधूनि पाहे
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केले। तया सारिखे भोगणे प्राप्त झाले ॥१०॥

मना मानसी दुःख आणू नको रे। मना सर्वथा शोक चिंता नको रे
विवेके देहेबुद्धि सोडूनि द्यावी। विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी ॥११॥

मना सर्वथा सत्य सोडू नको रे। मना सर्वथा सत्य मांडू नको रे
मना सत्य ते सत्य वाचे वदावे। मना मिथ्य ते मिथ्य सोडूनि द्यावे ॥१२॥

असे हो जया अंतरी भाव जैसा। वसे हो तया अंतरी देव तैसा
अनन्यास रक्षितसे चापपाणी। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥१३॥

सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें। क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे
क्रियेवीण वाचाळता तें निवारी। तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥१४॥

जनीं वाद विवाद सोडूनि द्यावा। जनीं वाद संवाद सूखें करावा
जगी तोचि तो शोकसंतापहारी। तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥१५॥

तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें। विवेकें अहंभाव यातें जिणावें
अहंतागुणें वाद नाना विकारी। तुटें वाद संवाद तो हीतकारी ॥१६॥

हिताकारणें बोलणे सत्य आहे। हिताकारणें सर्व शोधूनि पाहें
हिताकारणें बंड पाखांड वारी। तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥१७॥

जनीं सांगता ऐकता जन्म गेला। परी वादविवाद तैसाच ठेला
उठे संशयो वाद हा दंभधारी। तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥१८॥

फुकाचे मुखीं बोलता काय वेंचे। दिसेंदीस अभ्यंतरी गर्व साचें
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे। विचारें तुझा तूचि शोधूनि पाहे ॥१९॥

तुटे वाद संवाद तेथें करावा। विवेकें अहंभाव हा पालटावा
जनीं बोलण्यासारिखें आचरावे। क्रियापालटें भक्तिपंथेचि जावे ॥२०॥

मना अल्प संकल्प तोहि नसावा। सदा सत्यसंकल्प चित्ती वसावा
जनीं जल्प वीकल्प तोही त्यजावा। रमाकांत एकांतकाळी भजावा ॥२१॥

विचारूनि बोले विवंचूनि चाले। तयाचेनि संतप्त तेही निवाले
बरे शोधल्यावीण बोलो नको हो। जनी चालणे शुद्ध नेमस्त राहो ॥२२॥

नसे गर्व अंगी सदा वीतरागी। क्षमा शांती भोगी दयादक्ष योगी
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा। इही लक्षणी जाणिव योगिराणा ॥२३॥

धरी रे मना संगती सज्जनाची। जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची
बळे भाव सद्बुद्धि सन्मार्ग लागे। महाक्रूर तो काळ विक्राळ भंगे ॥२४॥

भये व्यापिले सर्व ब्रह्मांड आहे। भयातीत तें संत आनंत पाहे
जया पाहता द्वैत कांहीं दिसेना। भया मानसी सर्वथाही असेना ॥२५॥

म्हणे जाणता तो जनी मूर्ख पाहे। अतर्कासि तर्की असा कोण आहे
जनी मी पणें पाहता पाहवेना। तया लक्षिता वेगळे राहवेना ॥२६॥

नको रे मना वाद हा खेदकारी। नको रे माना भेद नाना विकारी
नको रे मना शीकवूं पूढिलांसि। अहंभाव जो राहिला तूजपासी ॥२७॥

अहंतागुणें सर्वही दुःख होते। मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें
सुखी राहता सर्वही सूख आहे। अहंता तुझी तूंचि शोधूनि पाहे ॥२८॥

अहंतागुणें नीति सांडी विवेकी। अनीतीबळे श्लाघ्यता सर्व लोकीं
परी अंतरी सर्वही साक्ष येतें। प्रमाणांतरें बुद्धि सांडुनि जाते ॥२९॥

देहेबुद्धिचा निश्चयो दृढ जाला। देहातीत तें हीत सांडीत गेला
देहेबुद्धि ते आत्मबुद्धि करावी। सदा संगती सज्जनाची धरावी ॥३०॥

मनें कल्पिला वीषयी सोडवावा। मनें देव तो निर्गुण ओळखावा
मने कल्पितां कल्पना ते सरावी। सदा संगती सज्जनाचि धरावी ॥३१॥

जया मानला देव तो पूजिताहे। परी देव शोधूनि कोणी न पाहे
जगीं पाहता देव कोट्यानुकोटी। जया मानली भक्ति जे तेचि मोठी ॥३२॥

सदा सर्वदा राम सन्निध आहे। मना सज्जना सत्य शोधूनी पाहे
अखंडीत भेटी रघूराजयोग । मना सांडी रे मीपणाचा वियोग ॥३३॥

मना सर्वही संग सोडूनि द्यावा। अती आदरें सज्जनाचा धरावा
जयाचेनि संगे महादुःख भंगे। जनीं साधनेवीण सन्मार्ग लागे ॥३४॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥